# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

MERC/ADM/RTI/045/2023/0187

Dt. 24.04.2023

प्रति,
श्री. विठ्ठलराव गायकवाड,
सरचिटणीस, मुंबई इलेक्ट्रिक वर्कर्स युनियन कार्यालय,
भारतकुंज बिल्डींग, २ रा मजला,
व्ही. एन. देसाई हॉस्पिटल जवळ,
दिनकर पटेल उद्यान समोर, ६ वा रस्ता,
सांताक्रुझ (पुर्व), मुंबई - ४०००५५.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. १०.०४.२०२३ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि.१०.०४.२०२३ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

<table>
<tr><th>No</th><th>Information Sought</th><th>Information Provided</th></tr>
<tr><td></td><td colspan="2">बृहन्मुंबई विज वितरण उद्योगामध्ये बेस्ट उपक्रम व अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई कंपनी व्यवस्थापनाने वीज वितरण केलेल्या विजेची घट कमी करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने काढलेल्या सुचनेची माहिती खाली नमूद मुद्या अन्वये मिळावी.</td></tr>
<tr><td>अ</td><td>मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमातर्फे बृहन्मुंबईचा मध्य मुंबई मध्ये वीज ग्राहकांना टाटा विज कंपनी कडून वीज खरेदी करून विजेचा पुरवठा करत आहे. विज वितरण करताना खरेदी केलेल्या विजे मध्ये घट होते. घट कमी केली तर घटीच्या प्रमाणात बेस्ट उपक्रमाच्या अधिकाऱ्यांना व कामगारांना दिला जात असलेल्या पॉवर लॉस (डिस्ट्रीब्युशन लॉस) चे प्रमाण काय ठरविण्यात आले आहे. त्याची प्रत मिळावी. डिस्ट्रीब्युशन लॉसेस भत्ता देण्याचे आदेश दिले आहेत त्याची माहिती मिळावी.</td><td rowspan="5">मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यासंबंधीची माहिती प्रकरण क्र. २०१७ चे २०३, प्रकरण क्र. २०१९ चे ३२४ आणि प्रकरण क्र. २१२ चे २०२२ मध्ये आयोगाने अनुक्रमे दि.१२ सप्टेंबर, २०१८, दि. ३० मार्च, २०२० आणि दि.३१ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या आदेशामध्ये उपलब्ध आहे<br><br>तसेच अदाणी इलेक्ट्रीसिटी मुंबई यासंबंधीची माहिती प्रकरण क्र. २०१७ चे २००, प्रकरण क्र. २०१९ चे ३२५ आणि प्रकरण क्र. २३१ चे २०२२ मध्ये आयोगाने अनुक्रमे दि.१२ सप्टेंबर, २०१८, दि. ३० मार्च, २०२० आणि दि.३१ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या आदेशामध्ये उपलब्ध आहे<br><br>उपरोक्त आदेश आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.</td></tr>
<tr><td>ब</td><td>अदाणी इलेक्ट्रीसिटी मुंबई कंपनी तर्फे मुंबईच्या उपनगरातील विज ग्राहकांना विज पुरवठा केला जातो. विज पुरवठा करताना विजेची घट होते. या घटीचे प्रमाण ठरविण्याची सुचना (नोटीस) काढल्याची प्रत आम्हांला देण्याची व्यवस्था करावी.</td></tr>
<tr><td>क</td><td>विज वितरीत करताना विजेच्या घटीच्या प्रमाणात अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई व्यवस्थापनाने कामगार, कर्मचारी व अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या डिस्ट्रीब्युशन लॉसेस भत्याच्या रक्कमेचे प्रमाण किती आहे. त्या आदेशाची प्रत मिळावी.</td></tr>
<tr><td>ड</td><td>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने सन २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२०, २०२०-२०२१, २०२१-२०२२, २०२२-२०२३ सालामध्ये अदाणी इलेक्ट्रिसीटी मुंबई कंपनीने वितरीत केलेल्या विज पुरवठया मध्ये किती घट कमी झाली त्या प्रत्येक वर्षाची आकडेवारी आम्हांला मिळावी.</td></tr>
<tr><td>इ</td><td>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने सन २०१६-२०१७, २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२०, २०२०-२०२१, २०२१-२०२२, २०२२-२०२३ सालामध्ये विजेच्या घटीच्या प्रमाणात कामगार व अधिकाऱ्यांना दिलेल्या पॉवर लॉस (डिस्ट्रीब्युशन लॉस) भत्याची रक्कम किती प्रमाणात दिली त्याचा अहवाल महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाला सादर केला असल्याची लेखी माहिती मिळावी.</td></tr>
</table>

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in Website : www.merc.gov.in

As per the Hon'ble CIC decision No. CIC/YA/A/2014/000379/SB Dated 19.09.2016 in the matter of Shri. K. Lall Vs M. K. Bagri, Assistant Registrar of Companies and CPIO, Appeal No. CIC/AT/A/2007/00112, dated 12.04.2007, since the same is available in public domain, the PIO is not obliged to provide the same to the appellant under the RTI Act.

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री अनिलकुमार उके, संचालक (विधी) प्रभारी / प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४ / ६५ / ६९ **Email: anilkumar.ukey@merc.gov.in** .

आपला विश्वासू,

(अरूण वाळुंज)
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव